**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.५१४/२०१९**
**निशाणी क्रमांकः– ५४ खाली**
**शोभा जाधव व इ. वि. शंकर मंजुळे व इ.**

**अर्जदार तर्फे साक्षीदार क्रमांक १ यांची शपथेवरील जबानी**
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की,
माझे नावः– शोभा आनंदराव जाधव

**सरतपास अर्जदार तर्फे वकील एस.जी.पाटकर यांचे मार्फत सुरू**

**०१.** सदर प्रतिज्ञापत्रातील मजकूर माझे सांगण्याप्रमाणे लिहिलेला आहे व तो बरोबर आहे व तो वाचल्यानंतर मी त्यावर सही केली. माझे आई व वडिल यांच्या मृत्यूचे मुळ दाखले मी दाखल केले आहेत. त्यांना अनुक्रमे **नि.५५ व ५६** देण्यात येत आहे. माझी आजी सोनुबाई बापू मंजुळे यांच्या मृत्युचे प्रमाणपत्र उपलब्ध नसल्याबाबत मी प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र. ५७** देण्यात येत आहे. माझ्या वडिलांच्या नावावर असलेल्या मालमत्तेच्या संदर्भात प्रमाणित रूल कार्ड मी दाखल केले आहे. त्यास **नि.क्र. ५८** देण्यात येत आहे.

**अर्जदारांच्या वकिलांच्या तोंडी विनंतीमुळे सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब**

श्रवणोत्तर स्वीकृत.

**ठिकाणः पनवेल** **(आर. वाय.खंडारे)**
**दिनांकः– ०४/०२/२०२६.** **५वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, पनवेल**

**सरतपास अर्जदार तर्फे वकील एस.जी.पाटकर यांचे मार्फत शपथेवर पुढे सुरू**

०२. माझ्या रेशनकार्डची झेरॉक्स प्रत दाखल केली आहे व मुळ प्रत सोबत आणली आहे. मुळ वरून झेरॉक्स पडताळुन पाहिली ती बरोबर आहे. त्यास **नि. ६३** देण्यात येत आहे. तसेच माझ्या आधारकार्डची झेरॉक्स प्रत दाखल केली आहे व मुळ प्रत सोबत आणली आहे. मुळ वरून झेरॉक्स पडताळुन पाहिली ती बरोबर आहे. त्यास **नि. ६४** देण्यात येत आहे. मिडल क्लास सोसायटी यांनी माझ्या नावे दिलेले दि. १६/०२/२०१८ रोजीचे मुळ पत्र मी दाखल केले आहे. त्यास **नि. ६५** देण्यात येत आहे. पनवेल महानगरपालिकेने सामनेवाला क्र. ६ यांच्या नावे दिलेले दि. ०२/०२/२०२३ रोजीचे पत्र मी दाखल केले आहे. सामनेवाला क्र. ६ यांनी नि. ३९ वर नाहरकत दाखल केली असल्यामुळे सदर पत्रास **नि. ६६** देण्यात येत आहे. दैनिक वादळवारा या पेपरमध्ये दि. ०१/०७/२०१९ रोजी जाहिरनोटीस प्रकाशित केली होती तो पेपर मी दाखल केला आहे. त्यास **आर्टिकल अ** देण्यात येत आहे.

**सरतपास पूर्ण**

**उलटतपास सामनेवाला क्र. १, ३ व ४ तर्फे वकिल श्री. दिपक शेळके यांचेमार्फत सुरू**

०१. सदर प्रकरण मी माझ्या वडिलांच्या मालमत्तेवर आम्ही चार भाऊ व चार बहिणी यांची नावे लावण्याकरीता दाखल केले आहे. मालमत्तेचा क्रमांक प्लॉट क्र. १४७ असा आहे. सदर मिळकत आजही मसु बापु मंजुळे यांच्याच नावावर आहे. त्यांना एकुण ८ वारस आहेत. माझ्या वडिलांनी कोणतेही मृत्युपत्र केले नाही.

**उलटतपास पूर्ण.**

**सामनेवाला क्र. ५ व ६ गैरहजर त्यामुळे उलटतपास नाही.**
**सामनेवाला क्र. २ तर्फे वेळ मिळण्याकरीता अर्ज दिल्याने उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर स्वीकृत.

**ठिकाणः पनवेल** **(आर. वाय.खंडारे)**
**दिनांकः– ०२/०७/२०२६.** **५वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, पनवेल**

**उलटतपास सामनेवाला क्र.२ तर्फे वकिल श्री. गोवारी यांचेमार्फत शपथेवर सुरू**

०२. सध्या वादमिळकत सामनेवाला क्र. २ सिताराम यांच्या नावावर नाही. वादमिळकत हि घराची जागा आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर मिळकतीवर सामनेवाला क्र. २ यांचे नाव लागलेले आहे.

०३. मी सदर प्रकरणात मी मसु मंजुळे यांची मुलगी असल्याबाबत शाळेचा दाखला दाखल केलेला आहे. माझे शिक्षण ८ वी पर्यंत झालेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादमिळकतीवरील घर सामनेवाला क्र. २ यांनी बांधलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, घर बांधल्यापासुन सामनेवाला क्र. २ तेथेच राहत आहे. हे म्हणणे खरे नाही की, घर बांधताना संपूर्ण खर्च सामनेवाला क्र. २ यांनीच केला. माझे वडिल दि. २३/११/१९८५ रोजी वारलेले आहेत. सन १९८५ पासुन वारस दाखला मिळण्याकरीता प्रकरण का दाखल केले नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. माझे लग्न होऊन ५३ वर्ष झाले आहेत. लग्न झाल्यापासून मी सासरीच राहत आहे व सुट्टीच्या काळात माहेरी येत होते. मी कुठल्या सुट्टीच्या काळात माहेरी यायचे हे मी माझ्या पुराव्याच्या शपथपत्रात लिहिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, घराची घरपट्टी व लाईट बिल सामनेवाला क्र. २ हाच भरत आलेला आहे.

०४. सदर प्रकरण दाखल करण्यापूर्वी मी सामनेवाला क्र. २ विरूध्द दावा दाखल केला होता त्याचा क्रमांक विशेष दिवाणी दावा क्र.१२०/२०१८ असा आहे. तो दावा न्यायालयाने खारीज केलेला आहे. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, कलम १६४ खाली सोसायटीला अर्ज दिला नाही म्हणुन तो दावा फेटाळला आहे. हे म्हणणे खरे नाही की, वडिल वारण्यापूर्वीपासुन सदर मालमत्ता सामनेवाला क्र. २ याच्या नावावर होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर मालमत्ता वडिल वारले तेव्हा त्यांच्या नावावर नव्हती व त्यामुळे मला सदर मालमत्तेत हिस्सा मागण्याचा अधिकार नाही. सामनेवाला क्र. २ वगळता माझे सर्व बहिण, भाऊ आज न्यायालयात हजर आहेत. साक्षीदार पुन्हा सांगते की, सामनेवाला क्र. ५ हि आजारपणामुळे आज आलेली नाही. मी सर्व अर्जदारांच्यातर्फे साक्ष देत आहे. मला अर्जदार क्र. २ हिने साक्ष देण्याकरीता मुखत्यारपत्र दिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सर्व अर्जदारांतर्फे साक्ष देत आहे असे खोटे सांगत आहे.

**०५.** हे म्हणणे खरे आहे की, मी व माझ्या सर्व बहिणी सासरी सुखा समाधानाने नांदत आहोत. विशेष दिवाणी दावा क्र. १२०/२०१८ मधील निर्णयाविरूध्द मी वरिष्ठ न्यायालयात अपिल दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, तो दावा फेटाळला म्हणुन मी सदर प्रकरण दाखल केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, **नि. ५५ व ५६** वर दाखल केलेले मृत्यु दाखले चुकीचे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सोनुबाई बापु मंजुळे यांच्याबाबत **नि.५७** वर दाखल केलेले प्रतिज्ञापत्र चुकीचे आहे. हे म्हणणे खरे नाही की, **नि.५८** वरील रूल कार्ड चुकीचे दाखल केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, **नि.६३** वरील रेशनकार्ड चुकीचे व खोटे दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, **नि.६४** वरील आधारकार्ड चुकीचे आहे. हे म्हणणे खरे नाही की, **नि.६५** वरील मिडलक्लास सोसायटीचे पत्र खोटे आहे. हे म्हणणे खरे नाही की, **नि. ६६** वरील ना–हरकत दाखला खोटा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, वारस दाखल्याबाबत पेपरला बातमी दिली असे खोटे सांगत आहे.

**०६.** हे म्हणणे खरे आहे की, सामनेवाला क्र. १, ३ व ४ यांचेसोबत माझे चांगले संबंध आहेत व त्यांचे घरी माझे जाणे येणे आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या पुराव्याच्या शपथपत्रामध्ये लिहिलेला संपूर्ण मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाला क्र. २ ला त्रास देण्याकरीता मी सदर प्रकरण दाखल केले आहे.

**उलटतपास पूर्ण.**
**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत.

RAJESH YASHWANTRAO KHANDARE
Digitally signed by RAJESH YASHWANTRAO KHANDARE
Date: 2026.07.23 17:31:23 +0530

**ठिकाणः पनवेल** **(आर. वाय.खंडारे)**
**दिनांकः– २३/०७/२०२६.** **५वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, पनवेल**